MHWS080003792025

**दि.कि.अर्ज क्रं. ४३/२०२५ मधील नि.क्र. २३ वरील आदेश**

गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला लेखी जबाब नाही चा आदेश रदद होउन त्यांचा लेखी जवाब दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** अर्जातील गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांचे कथनानुसार, गैरअर्जदार क्र.०१ ही वयोवृध्द असून सतत आजारी असते. गैरअर्जदार क्र.०२ व ०३ यांना रक्तदाब व मधुमेह आजार असून ते सुध्दा सतत आजारी असतात. त्यामुळे गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांना वेळेत म्हणणे देता आले नाही. त्यामुळे लेखी जबाब नाहीचा आदेश पारित झाला असून प्रकरणाचे योग्य निकालाकरीता गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करुन घेणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होउन त्यांचेवर अन्याय होईल. याउलट अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नसल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर अर्जदाराचे लेखी म्हणणे मागविण्यात आले. अर्जदाराचे म्हणण्यानुसार गैरअर्जदार यांचेवर दिनांक ०६.०३.२०२५ रोजी नोटीस बजावणी होउन ते याकामी हजर झाले. परंतु त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. त्यामुळे लेखी जबाब नाहीचा आदेश पारित झाला असून अर्जदाराचा पुरावा दाखल केलेला आहे. अर्जात नमूद कारणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसून केवळ प्रकरण लांबणीवर टाकण्याकरीता जाणीवपूर्वक ३ महिने ३ दिवसांचा विलंब झाला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा यदाकदाचित मंजूर करणेचे झालेस जास्तीत जास्त दंड आकारावा.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज भारतीय वारसा कायदा कलम ३८३ नुसार, वारसप्रमाणपत्र रदद होण्याकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी गैरअर्जदार क्र.०१ ते

०३ यांना नि.क्र.०६ व ०७ वरील बेलिफ रिपोर्ट नुसार समन्स बजावणी होउन व ते याकामी हजर होउन देखील जबाब दाखल न केल्याने त्यांचे विरुध्द विनाजबाब चौकशीचा आदेश दिनांक १६.०६.२०२५ रोजी पारित करण्यात आला. त्यानंतर सदरचा अर्ज सुमारे तीन महिन्याचे कालावधीने दाखल केल्याचे दिसून येते. अर्जात नमूद कारणास्तव कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसल्याने अर्जातील कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु गैरअर्जदार यांचा सदरचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांना स्वतःचा बचाव मांडण्याची संधी नाकारल्यासारखी होईल व अर्जदाराचा मुळ अर्ज गुणदोषांवर निकाली करण्यास अडचणीचे होणार आहे. सबब गैरअर्जदार यांचा अर्ज म्हणणे दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत योग्य तो दंड आकारुन मंजूर करणे आवश्यक असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

## —: **<u>आदेश</u>** :—

१ गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. २३ मंजूर करण्यात येतो.

२ गैरअर्जदार क्र.०१ ते ०३ यांना लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी प्रत्येकी रक्कम रू. २००/— चा दंड अर्जदारांना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. गैरअर्जदार यांनी दिलेला लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर अर्जाच्या कामी दाखल करण्यात यावा.

PRATAP VISHNU SAPKAL Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL Date: 2025.09.26 16:12:44 +0530

(पी. व्ही. सपकाळ)
दिनांक — २६.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | 09.01.2025 |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | 09.01.2025 |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | 09.01.2025 |